**क्र.का.१२/मू/परतावा/१९९६–२०२५/**
**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे १**
**दिनांक :– २९.०८.१९९४**

**प्रति,**

**सर्व मुद्रांक जिल्हाधिकारी व**
**सह जिल्हा निबंधक**

**विषय :– मुद्रांक परतावा प्रकरणी प्रतिज्ञापत्राबाबत..**

मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ चे कलम ४७, ५०, ५१,५२ मधील तरतुदींपैकी अर्जदाराने कोणत्या कारणासाठी मुद्रांकाचा परतावा मागितला आहे. याबाबत मुद्रांक जिल्हाधिकारी यांची खात्री होणे आवश्यक असल्याने अर्जदाराकडून प्रतिज्ञापत्र घेण्यात येते. याबाबत असे निदर्शनास आले की, अर्जदारांनी सादर केलेली प्रमाणपत्र वेगवेगळ्या स्वरूपाची असतात. काही प्रतिज्ञापत्रे त्रोटक असतात तर काही प्रतिज्ञापत्रात अनावश्यक मजकूर असतो. अर्जदारांकडून घेण्यात येणाऱ्या या प्रतिज्ञापत्रामध्ये एकसूत्रीपणा असण्यासाठी इंग्रजी व मराठी भाषेतील नमूना प्रतिज्ञापत्रे सोबत जोडली आहेत. अर्जदारास याबाबत माहिती देवून प्रकरणानुरूप योग्य त्या तरतुदीचा उल्लेख करून या नमुन्यात प्रतिज्ञापत्र देण्यास सांगण्यात यावे.

याशिवाय परतावा प्रकरण या कार्यालयास पाठविण्यापूर्वी खालील बाबी लक्षात घ्याव्यात.

१) परतावा अर्जावर दाखल तारीख आवश्यक आहे.

२) पक्षकाराचे संपूर्ण नांव व पत्ता सुवाच्च अक्षरात नमूद करण्यात यावे.

३) प्रकरणाची व्यवस्थित छाननी करून प्रकरण कोणत्या तरतुदीखाली येते याबाबत स्पष्ट अभिप्राय देण्यात यावेत.

४) प्रकरण अपूर्ण पाठविले जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

**का.प्र.मा.नों.म.नि.**
**यांचे सहीची असे.**

**सही/–**
**(सू.शा.माळी)**
**उप नोंदणी महानिरीक्षक,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

**मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ च्या कलम ४७ अन्वये वापरण्यास अयोग्य असलेल्या मुद्रांकाबाबत परतावा देण्यासाठी केलेल्या अर्जासोबत द्यावयाचे प्रतिज्ञापत्र.**

**: प्रतिज्ञापत्र :**

मी, श्री/श्रीमती.................................................... वय.....वर्षे, राहणार........................................................ सत्य प्रतिज्ञेवर जाहीररित्या कथन करतो व हमी देतो की -

मी ........................................ मुद्रांकाबाबत परतावा देण्यासाठी केलेल्या अर्जाबाबत असे प्रतिज्ञेवर नमूद करू इच्छितो की, मला उपयोगी नसलेल्या मुद्रांकाबाबत परतावा देण्यासाठी दिनांक ................... रोजी मुद्रांक अधिकाऱ्याकडे अर्ज सादर केला आहे. सदर अर्जासोबत सादर केलेले मुद्रांक हे मी मला करावयाच्या कायदेशीर व्यवहारासाठी मुद्रांक विक्रेता/उपकोषागार अधिकारी/मुद्रांक अधिक्षक, मुंबई यांचेकडून पावती अनुक्रमांक ................... दिनांक ............. अन्वये खरेदी केले होते. खरेदीबाबतचे आवश्यक ते मूळ कागदपत्र सदरहू अर्जासोबत पुराव्यादाखल जोडले आहेत.

ज्या सलेखासाठी मुद्रांक वापरला/वापरले आहेत ते मी दिनांक ............. रोजी निष्पादित केला आहे/केला नाही तसेच अन्य सलेख दि..................... रोजी निष्पादित केला आहे/केला नाही.

सदरहू सलेख सुरूवातीपासून कायद्याने सर्वथा शून्य असल्याचे मला/विक्रेता/ ग्राहक यांना नंतर आढळून आले.

विनिर्दिष्ट अनुतोष अधिनियम, १९६३ च्या कलम ३१ खाली सदरहू सलेख सुरूवातीपासून सर्वथा शून्य असल्याचे, न्यायालयाला नंतर आढळून आले आहे.

सलेखातील त्रुटींमुळे किंवा चुकींमुळे नियोजित प्रयोजनासाठी अपात्र असल्याचे नंतर आढळून आले आहे.

तो सलेख ज्या व्यक्तीने निष्पादित करणे आवश्यक आहे ती / त्या व्यक्ती विक्रेता/ग्राहक/मध्यस्थ सलेख निष्पादित न करताच मरण पावल्यामुळे/किंवा संबंधित व्यक्तीने तो निष्पादित करण्यास नकार दिल्यामुळे नियोजित सव्यवहार संकल्पित स्वरूपात घडवून आणण्याच्या दृष्टीने पूर्ण करता येत नाही.

सदरहू...............................................सलेख विक्रेता/मध्यस्थ यांनी निष्पादित न केल्यामुळे व त्यावर सही करण्यास तो/ते असमर्थ आहे/आहेत अथवा नकार देत आहेत आणि नियोजित प्रयोजनासाठी तो वस्तुतः अपूर्ण व अपर्याप्त आहे.

विक्रेता/ग्राहक/मध्यस्थ...............................................सलेखान्वये कृती करण्यास किंवा याद्वारे प्रतिभूत करावयाचे, योजिलेला पैसा देण्यास नकार दिल्यामुळे की ज्या अन्वये नियोजित प्रयोजन सर्वथः फसले आहे.

अपुऱ्या मूल्याचा आणि याद्वारे जो संव्यवहार घडवून आणण्याचे योजिले आहे तो संव्यवहार त्याच पत्राच्या दरम्यान व त्यापेक्षा कमी मूल्य नसलेला मुद्रांक लावलेल्या संलेखाव्दारे घडवून आणला आहे.

अनवधानामुळे आणि अहेतुकपणे खराब झाला आहे आणि त्याऐवजी त्याच पक्षांच्या दरम्यान व त्याच प्रयोजनासाठी रितसर मुद्रांकित दुसरा संलेख निष्पादित करून दिलेला आहे.

सदरहू संलेखावर विहित केलेल्याहून अन्य वर्णनाचा/आवश्यक असलेल्या पेक्षा अधिक मूल्याचा/कोणतेही शुल्क आकारणीस पात्र नसताना मुद्रांक अनवधानाने वापरण्यात आला आहे.सदरहू संलेखासाठी वापरलेला मुद्रांक हा अशा प्रकारच्या संलेख, कलम १४च्या तरतुदीचे उल्लंघन करून लिहिण्यात आल्या कारणाने, कलम १५ खाली अनवधानाने निरूपयोगी झाला आहे.

मुद्रांक लावलेला सदरहू संलेखाबाबत कोणत्याही कायदेशीर कारवाईसाठी कोणत्याही न्यायालयात पुराव्यासाठी मी/माझ्या प्रतिनिधींनी सादर केलेला नाही आणि ह्या संलेखान्वये कोणतीही कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आलेली नाही.

माझ्या माहितीनुसार वरील निवेदन संपूर्णतः सत्य व वस्तुस्थितीस धरून आहे.

**ठिकाण :**

**दिनांक :** **स्वाक्षरी**

**ओळख शिफारस :**

Affidavit to be filed alongwith the refund application
under section 47 of the Bombay Stamp Act, 1958.

---------------------------------------------------------------------------------------------------

## ~: AFFIDAVIT :~

I, ______________________________________________________

_______________________________________________________________

do hereby solemnly affirm and declare as follows, that :-

I have submitted the refund application to the Collector of Stamps ________________ on / /1994. The stamp paper/papers attached alongwith refund application was/were purchased by me from Stamp Vendor/Sub-Treasury Officer/Superintendent of Stamps Bombay vide Sr.No. __________________ dated _____________ for bonafide use and full amount duly paid thereon. An evidence showing the purchase of stamps has been attached with refund application.

The Stamp/Stamps has/have been used for an instrument on ________________ which has been executed by me and other on _______________.

it has afterwards been found by me/Vendor/Purchaser to be absolutely void in law from the beginning.

It has afterwards been found by the court to be absolutely void from the beginning under section 31 of the specific relief Act, 1963.

It has afterwards been found unfit by reason of error and mistake therein for the purpose originally intended.

By reason of death of Vendor/Purchaser/Confirming Party/By whom it was necessary to be executed has refused to execute it, so as to effect the intended transaction in the form proposed.

For want of the execution thereof by the Vendor/Confirming Party and he/they is/are unable and refusing to sign it and it is therefore incomplete and insufficient for the purpose for which it was intended.

By the reason of the refusal of Vendor/Purchaser/Confirming Party to act under this deed of ___________________ and refused to advance money intended to be thereby secured.

It has become unseless in consequence of the transaction intened to be thereby effected by this instrument and the other instrument between me and the Vendor/Purchaser which bears a Stamp of not less value. This instrument is deficient in value and the transaction intended to be thereby effected had been effected by same other instrument between me and Purchaser/Vendor/and bearing a stamp of not less value.

It is inadvertently under/signedly spoiled and in lieu whereof another instrument is already executed between me and the Vendor/Purchaser for the same purpose which was duly stamped.

The Stamp of adescription other than prescribed for such instrument has been inadvertantly used.

Stamp of greater value than was necessary has been used / stamp has been inadvertantly used on the instrument which is not chargeable with duly.

Stamp used for the instrument has been inadvertantly rendered useless under section 15 owing to such instrument being written in contravention of provision of section 13.

No instrument in question has not been produced in any court for an evidence by me or by my representative and no legal proceeding have been commenced on the strength of the said instrument.

The above contents are true and current to the best of my knowledge and belief.

**Place :**

**Date :**

**Identification** **Signature**